राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी निकष ठरविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. असुका २०१३/प्र.क्र ३१९/नापु-२२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ डिसेंबर, २०१३

प्रस्तावना :-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार राज्यासाठी ७६.३२ टक्के ग्रामीण (४६९.७१ लक्ष) व ४५.३४ टक्के शहरी (२३०.४५ लक्ष) अशी मिळून ७००.१६ लक्ष लाभार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत राज्यातील लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजनेतील सर्व लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे. तर बीपीएल गटातील सर्व लाभार्थी प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून पात्र ठरत आहेत. त्याव्यतिरिक्त एपीएल (केशरी) मधील ग्रामीण भागातील २१६.८५ लक्ष व शहरी भागातील १८३.२२ लक्ष लाभार्थ्यांना प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून समावेश करावयाचा आहे. त्या अनुषंगाने एपीएल (केशरी) च्या लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता निकष निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरिता मा. मुख्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची उपसमिती दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आली. सदर समितीने विविध पर्यायांचा तसेच कालमर्यादेचा विचार करुन शासनाकडे असलेल्या शिधापत्रिकाधारकांच्या उत्पन्नाच्या माहितीच्या आधारे उत्पन्न मर्यादेचे निकष ठरवून लाभार्थी निवडण्याबाबत शिफारस केली होती. सन २०११ च्या अपात्र शिधापत्रिका शोधमोहिमेच्या अनुषंगाने शिधापत्रिकाधारकांकडून त्यांच्या उत्पन्नाची माहिती विहित नमुन्यात भरुन घेण्यात आली असून त्या माहितीच्या आधारे मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

१. <u>प्राधान्य गटातील लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता एपीएल (केशरी) लाभार्थ्यांसाठी कमाल उत्पन्न मर्यादा निश्चित करणे</u> :

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत सध्या लाभ घेत असलेल्या अंत्योदय अन्न योजनेतील सर्व लाभार्थ्यांचा अंत्योदय गटामध्ये समावेश करण्यात आला आहे. तर केंद्र

C:\Users\...\GR ...

शासनाच्या प्राधान्य गटासाठी दिलेल्या लाभार्थी संख्येचे उद्दिष्ट विचारात घेता सद्य:स्थितीतील बीपीएल गटातील सर्व लाभार्थ्यांचा प्राधान्य गटात समावेश होत आहे.

प्राधान्य गटातील उर्वरित लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता सध्या लाभ घेत असलेल्या एपीएल (केशरी) लाभार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे कमाल उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे:-

(क) ग्रामीण भागातील सध्याच्या बीपीएल व्यतिरिक्त सध्याच्या एपीएल (केशरी) गटातून कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ४४,०००/- पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांमधून २१६.८५ लक्ष लाभार्थी प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून निवडावेत.

(ख) शहरी भागातील सध्याच्या बीपीएल व्यतिरिक्त सध्याच्या एपीएल (केशरी) गटातून कमाल वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ५९,०००/- पर्यंत उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांमधून १८३.२२ लक्ष लाभार्थी प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून निवडावेत.

(ग) या योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील पात्र लाभार्थी व वगळावयाचे लाभार्थी याबाबतचा अनुमानित जिल्हानिहाय तपशील सोबतच्या परिशिष्ट "अ" व "ब" मध्ये दिलेला आहे.

(घ) त्यानुसार पात्र लाभार्थी व वगळावयाचे लाभार्थी यांच्या स्वतंत्र याद्या तयार करुन त्या गावनिहाय प्रसिध्द कराव्यात.

२. यापूर्वी फक्त अंत्योदय व बीपीएल लाभार्थ्यांच्या शिधापत्रिकांवर कुटुंबातील जेष्ठ महिलेच्या नावासमोर **"कुटुंबप्रमुख"** असा शिक्का मारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आता त्याचबरोबर एपीएल (केशरी) लाभार्थ्यांपैकी उपरोक्त परिच्छेद १ मधील (क) व (ख) मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार जे लाभार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील, त्यांच्या शिधापत्रिकांवर देखील कुटुंबातील जेष्ठ महिलेच्या नावासमोर **"कुटुंबप्रमुख"** असा शिक्का मारण्यात यावा.

तसेच, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार प्राधान्य गटात समावेश होणाऱ्या लाभार्थ्यांच्या शिधापत्रिकेतील प्रथम पृष्ठावर <u>वरील उजव्या कोपऱ्यात</u> "प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी" अशा शिक्का मारण्यात यावा.

लाभार्थी निवडण्याची व उपरोक्त दोन्ही शिक्के मारण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण करावी.

३. <u>लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सध्या लाभ घेत असलेल्या एपीएल (केशरी) च्या उर्वरित लाभार्थ्यांना लाभ देणे:</u>

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत सध्या लाभ घेत असलेल्या एपीएल (केशरी) लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांचा समावेश प्राधान्य गटातील लाभार्थी म्हणून झाला आहे, त्या व्यतिरिक्त उर्वरित एपीएल (केशरी) गटातील सुमारे १५७.१९ लक्ष लाभार्थी हे सध्याच्या लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत ज्या सवलतीच्या दराने अन्नधान्य घेत आहेत, त्या प्रचलित परिमाणानुसार व प्रचलित दराने त्यांना धान्य मिळणे चालू राहील.

२. सदर शासन निर्णयाबाबत वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक -१०९८/१३/व्यय-४, दिनांक ०३/१२/२०१३ अन्वये अभिप्राय घेण्यात आले आहेत.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्राचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in यावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१३१२१७१२१२३३७२०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दीपक कपूर

(दीपक कपूर)
सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
सर्व उपायुक्त (पुरवठा)
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
निवडनस्ती (कार्यासन नापु-२२)

परिशिष्ट 'अ'

शासन निर्णय क्र. असुका २०१३/प्रक्र ३११/नापु-२२, दि. २० डिसेंबर, २०१३

| Coverage Urban Population (dt. 10.10.13) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | District name | Total Coverage of AAY+BPL+Saffron Ration Card Population | Census-2011 Population | Coverage 45.34 % | Difference in existing RC coverage and prposed coverage under NFSO | Family Size in Saffron | Cards to be deleted |
| 1 | MTRA | 13,395,245 | 19,118,417 | 8,668,290 | -4,726,955 | 3.94 | -1,200,249 |
| 2 | Ahmadnagar | 599,379 | 913,071 | 413,986 | -185,393 | 3.98 | -46,599 |
| 3 | Akola | 518,173 | 721,849 | 327,286 | -190,887 | 5.01 | -38,064 |
| 4 | Amravati | 700,354 | 1,036,692 | 470,036 | -230,318 | 4.73 | -48,741 |
| 5 | Aurangabad | 1,519,751 | 1,616,601 | 732,967 | -786,784 | 4.60 | -171,049 |
| 6 | Beed | 373,870 | 514,685 | 233,358 | -140,512 | 4.22 | -33,260 |
| 7 | Bhandara | 149,579 | 233,757 | 105,985 | -43,594 | 4.75 | -9,174 |
| 8 | Buldana | 405,820 | 549,389 | 249,093 | -156,727 | 4.75 | -33,029 |
| 9 | Chandrapur | 386,481 | 769,838 | 349,045 | -37,437 | 3.51 | -10,653 |
| 10 | Dhule | 481,614 | 571,747 | 259,230 | -222,384 | 4.09 | -54,374 |
| 11 | Gadchiroli | 37,309 | 117,937 | 53,473 | 16,164 | 3.77 | 4,282 |
| 12 | Gondiya | 136,713 | 225,700 | 102,332 | -34,380 | 3.60 | -9,537 |
| 13 | Hingoli | 19,479 | 178,871 | 81,100 | 61,621 | 2.03 | 30,366 |
| 14 | Jalgaon | 1,023,208 | 1,343,458 | 609,124 | -414,084 | 4.52 | -91,543 |
| 15 | Jalna | 267,809 | 377,232 | 171,037 | -96,772 | 5.86 | -16,501 |
| 16 | Kolhapur | 876,806 | 1,229,896 | 557,635 | -319,171 | 3.57 | -89,376 |
| 17 | Latur | 428,191 | 625,458 | 283,583 | -144,608 | 5.01 | -28,844 |
| 18 | Nagpur | 2,288,654 | 3,178,194 | 1,440,993 | -847,661 | 3.91 | -216,729 |
| 19 | Nanded | 711,785 | 913,832 | 414,331 | -297,453 | 5.80 | -51,267 |
| 20 | Nandurbar | 197,161 | 275,182 | 124,768 | -72,393 | 4.33 | -16,729 |
| 21 | Nashik | 1,918,128 | 2,598,167 | 1,178,009 | -740,119 | 3.99 | -185,313 |
| 22 | Osmanabad | 52,592 | 281,598 | 127,677 | 75,085 | 1.89 | 39,695 |
| 23 | Parbhani | 367,092 | 569,870 | 258,379 | -108,713 | 3.63 | -29,934 |
| 24 | Pune | 2,127,516 | 5,739,716 | 2,602,387 | 474,871 | 2.55 | 186,221 |
| 25 | Raigarh | 403,760 | 972,809 | 441,072 | 37,311 | 3.69 | 10,115 |
| 26 | Ratnagiri | 90,807 | 263,610 | 119,521 | 28,713 | 4.11 | 6,984 |
| 27 | Sangli | 602,453 | 719,432 | 326,190 | -276,262 | 3.59 | -76,986 |
| 28 | Satara | 343,297 | 570,228 | 258,541 | -84,755 | 4.20 | -20,195 |
| 29 | Sindhudurg | 52,796 | 106,998 | 48,513 | -4,283 | 2.84 | -1,511 |
| 30 | Solapur | 1,238,573 | 1,398,439 | 634,052 | -604,521 | 3.68 | -164,218 |
| 31 | Thane | 896,597 | 1,863,124 | 844,740 | -51,857 | 2.88 | -18,000 |
| 32 | Wardha | 286,068 | 420,873 | 190,824 | -95,244 | 4.44 | -21,446 |
| 33 | Washim | 200,570 | 211,656 | 95,965 | -104,605 | 4.84 | -21,607 |
| 34 | Yavatmal | 307,968 | 599,205 | 271,680 | -36,289 | 4.50 | -8,065 |
| Total | | 33,405,597 | 50,827,531 | 23,045,203 | -10,360,394 | 4.02 | -2,435,329 |

परिशिष्ट 'ब'

शासन निर्णय क्र. असुका २०१३/प्रक्र ३११/ना.पु.२२, दि. १७ डिसेंबर, २०१३

| Coverage Rural Population (dt. 10.10.13) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | District name | Total Coverage of AAY+BPL+Saffron Ration Card Population | Census-2011 Population | Coverage 76.32 % | Difference in existing RC coverage and prposed coverage under NFSO | Family Size In Saffron | Cards to be deleted |
| 1 | MTRA | 323,652 | 493,403 | 376,565 | 52,913 | 3.94 | 13,430 |
| 2 | Ahmadnagar | 3,003,148 | 3,630,012 | 2,770,425 | -232,723 | 4.22 | -55,184 |
| 3 | Akola | 1,002,777 | 1,096,768 | 837,053 | -165,724 | 4.71 | -35,189 |
| 4 | Amravati | 1,840,551 | 1,851,134 | 1,412,785 | -427,766 | 4.36 | -98,052 |
| 5 | Aurangabad | 2,241,001 | 2,079,327 | 1,586,942 | -654,059 | 4.68 | -139,796 |
| 6 | Beed | 1,888,157 | 2,071,277 | 1,580,799 | -307,358 | 3.40 | -90,416 |
| 7 | Bhandara | 952,943 | 965,053 | 736,528 | -216,414 | 4.77 | -45,326 |
| 8 | Buldana | 1,810,855 | 2,038,650 | 1,555,898 | -254,957 | 4.77 | -53,461 |
| 9 | Chandrapur | 1,194,167 | 1,424,424 | 1,087,120 | -107,047 | 3.53 | -30,323 |
| 10 | Dhule | 1,345,842 | 1,477,034 | 1,127,272 | -218,569 | 4.07 | -53,728 |
| 11 | Gadchiroli | 754,472 | 953,858 | 727,984 | -26,488 | 3.94 | -6,722 |
| 12 | Gondiya | 1,095,995 | 1,096,631 | 836,949 | -259,046 | 4.43 | -58,473 |
| 13 | Hingoli | 293,547 | 1,000,102 | 763,278 | 469,731 | 1.90 | 247,206 |
| 14 | Jalgaon | 2,879,960 | 2,880,984 | 2,198,767 | -681,193 | 4.38 | -155,520 |
| 15 | Jalna | 1,297,769 | 1,581,251 | 1,206,811 | -90,958 | 4.35 | -20,924 |
| 16 | Kolhapur | 2,291,832 | 2,644,119 | 2,017,992 | -273,841 | 4.14 | -66,101 |
| 17 | Latur | 1,629,803 | 1,830,085 | 1,396,721 | -233,082 | 4.62 | -50,451 |
| 18 | Nagpur | 1,749,897 | 1,474,977 | 1,125,702 | -624,194 | 4.50 | -138,784 |
| 19 | Nanded | 2,245,355 | 2,442,734 | 1,864,295 | -381,060 | 4.72 | -80,768 |
| 20 | Nandurbar | 1,336,945 | 1,370,995 | 1,046,343 | -290,601 | 4.32 | -67,338 |
| 21 | Nashik | 2,653,613 | 3,510,885 | 2,679,507 | 25,895 | 4.14 | 6,253 |
| 22 | Osmanabad | 936,423 | 1,378,713 | 1,052,234 | 115,811 | 2.71 | 42,773 |
| 23 | Parbhani | 827,092 | 1,266,112 | 966,297 | 139,205 | 3.34 | 41,634 |
| 24 | Pune | 2,643,458 | 3,687,243 | 2,814,104 | 170,646 | 4.04 | 42,252 |
| 25 | Raigarh | 1,985,576 | 1,662,585 | 1,268,885 | -716,691 | 4.13 | -173,378 |
| 26 | Ratnagiri | 1,412,840 | 1,349,062 | 1,029,604 | -383,236 | 4.14 | -92,491 |
| 27 | Sangli | 1,612,631 | 2,101,143 | 1,603,592 | -9,038 | 4.02 | -2,249 |
| 28 | Satara | 2,322,166 | 2,433,694 | 1,857,395 | -464,770 | 4.24 | -109,704 |
| 29 | Sindhudurg | 687,437 | 741,870 | 566,195 | -121,242 | 3.54 | -34,273 |
| 30 | Solapur | 2,503,867 | 2,917,088 | 2,226,322 | -277,546 | 4.38 | -63,319 |
| 31 | Thane | 2,050,308 | 2,057,634 | 1,570,386 | -479,922 | 4.16 | -115,249 |
| 32 | Wardha | 844,986 | 875,284 | 668,017 | -176,969 | 4.53 | -39,089 |
| 33 | Washim | 921,723 | 985,058 | 751,796 | -169,927 | 3.96 | -42,864 |
| 34 | Yavatmal | 1,748,465 | 2,176,252 | 1,660,916 | -87,550 | 4.32 | -20,273 |
| Total | | 54,329,252 | 61,545,441 | 46,971,481 | -7,357,771 | 4.10 | -1,545,901 |